म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
ग्रं. क्र.

IRBK-0112545

१२५४५

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.**

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# मुगरीचें शाळगांव



ना. ग. गोरे

म. ग्रं. सं. ठाणें

प्रौढ शिक्षणमाला : २

# मुरारीचें साळगांव


अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

लेखक
नारायण गणेश गोरे

किंम…

IRBK-0112545
IRBK-0112545

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.
(ता. अनेक …


धरण
गुरचरण
नवी शाळा
धरण
उत्तर
पश्चिम
पूर्व
दक्षिण
साळगांव

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय



## १. मुरारी कदम परत येतो.

मुरारी कदम फौजेंत जातों म्हणून एक दिवस साळगांव सोडून जो गेला तो चांगला सात आठ वर्षांनीं परत आला. त्यानें गांव सोडलें तेव्हां तो एकोणीस वर्षांचा, नुकती कोठें मिसरूड फुटूं लागलेला तरणा बांड होता. लहानपणापासून असायचा मात्र गुलाम मोठा चपळ, काटक आणि मिठास. आतां तो चांगला थोराड अंगाचा आणि रुबाबदार जवान झाला होता. अनेक देश हिंडून आला होता. लढाईंत त्यानें

चांगली बहादुरी गाजवली असावी हें त्याच्या छातीवरच्या निळ्या तांबड्या फितीवरून दिसतच होतें. गांवाच्या शिवेपासून घरीं जाईपर्यंत जे कोणी गांवकरी त्याला भेटले त्या सगळ्यांची त्यानें गोड हसून विचारपूस केली. लवकरच सगळ्या गांवभर बातमी पसरली कीं बाबाजी कदमचा फौजेंत गेलेला पोर परत आला आहे.

उन्हें कललीं तशीं गांवचीं माणसें एक एक बाबाजी कदमांच्या ओसरीवर जमायला लागलीं. पांडू न्हावी सर्वांत आधीं येऊन दाखल झाला आणि बाबाजी कदमांना म्हणाला, " बाबा, आज जाजम वाईच मोठंच आंथरा. लई मानूस येनार हाय. " मग शिदू सुतार आला. अंमळशानें म्हातारा लक्ष्मण सोनार आला, सदू तेली आला, चार पांच माणसांचा घोळका घेऊन बजाबा कुलकर्णी आले; आणि अखेरीला हातांत काठी घेतलेला विठोबा वेसकर पुढें आणि दहापांच गांवकरी भोंवतालीं असे आले हिंमतराव कदम. हिंमतराव गांवचे पाटील. तेव्हां ते आल्यावर बाबाजी व मुरारी सामोरे गेले आणि त्यांना त्यांनीं हाताला धरून गदेल्यावर आणून बसविलें. हिंमतरावांनीं मुरारीला आग्रहानें आपल्या शेजारीं बसवून घेतलें आणि तबकांतलें एक चांगलेंसें पान निवडून घेत ते त्याला म्हणाले,

" मुरारबा, अरे एकदां गेलास तो आज सात वर्षांनीं परत उगवतोस. हिकडं बाबांचा अर्धा जीव झाला. फिरलास तरी कुठं कुठं, तें सांग. "

मुरारी हसल्यासारखें करून म्हणाला,

" फिरलों होय? फिरलों पार इटलीपासून जपानपर्यंत. पण एवढं सगळं रामायण कुठंवर सांगत बसूं? कळेलच सगळं हळू हळू. मी कांहीं पुन्हा कुठं पळून जाणार नाहीं आहे."

" म्हणजे? पुन्हा फौजेंतल्या नोकरीवर हजर नाहीं होणार?" बजाबा कुलकर्ण्यांच्या मुलानें—तात्यानें विचारलें.

" नाहीं. मी आतां गांवांतच राहणार आहें."

" आणि करणार काय?" खुद्द बजाबांनीं चौकशी केली.

" शेती!"

" अक्षी ब्येस हाय मुरारबाचा बेत." विठोबा वेसकरनें लांबून पाठिंबा दर्शवीत म्हटलें, " गांवांत तरणं पोर टिकना. उठला तो चालला म्हमईला. गांवाला कांहीं कळा उरली न्हाई."

आपण वाजवीपेक्षां फार बोललों कीं काय अशी स्वतःलाच शंका येऊन विठोबा एकदम गप्प झाला.

" बरं तर. गांवांतच राहणार म्हटल्यावर भेट होईलच वरच्यावर. मग काय बाबाजी, घेऊं निरोप?" असें म्हणून पाटील उठले; तसें बाबाजी त्यांना अडवीत म्हणाले, " तसं कुठं जातां? घोट घोट चा तरी पिऊन जावा." मग चहापान झाल्यावर बैठक संपली.

## २. उजाड साळगांव!

मुरारीच्या परसदारापासून थोड्या अंतरावर एक टेकाड होतें. त्याला म्हणत चांभारटेंभ. मुरारी सकाळींच उठून चांभारटेंभावर गेला आणि मोठ्या उत्सुकतेनें खालीं पसरलेल्या आपल्या गांवाकडे पाहूं लागला. त्याला वाटलें आपल्या आठ वर्षांच्या गैरहजिरींत आपलें साळगांव खूप बदललें असेल. पण साळगांव अगदीं जसेंच्या तसेंच होतें. नाहीं म्हणायला गांवांतल्या वाण्याच्या घराला तेवढा नवा रंग काढलेला दिसत होता आणि मारुतीच्या देवळाचें शिखर सिमिटानें नवें बांधून काढलें होतें. मुख्य रस्त्यापासून साळगांव दोन मैल आंत होतें, पण दक्षिणोत्तर गेलेला मुख्य रस्ता आणि रस्त्यापासून गांवांत येणारा फाटा स्पष्ट दिसत होता. शौचविधि उरकण्यासाठीं गांवांतलीं माणसें ओढ्याच्या लवणाकडे चाललीं होतीं आणि डुकरांचे गलिच्छ तांडे रँव रँव करीत ओढ्याच्या कांठांनीं फिरत होते.

मुरारीचें साळगांव लोकवस्तीच्या दृष्टीनें कांहीं फार मोठें गांव नव्हतें. असेल तीन-चारशेंच्या सुमारानें उंबरा. साळगांवांत बहुतेक घरें कदमांचींच होतीं, त्यामुळें कदमांचें साळगांव या नांवानेंहि ओळखीत असत. गांव लहान असलें तरी गांवाचें शिवार खूप मोठें होतें, आणि पांझरीचा जित्या पाण्याचा ओढा सबंध गांवाला वळसा घालून गेलेला होता. मुरारी उभा होता त्या टेकडीलगतच गांवची मुख्य वस्ती

व कदमांचीं घरें वसलेलीं होतीं. पूर्वेकडच्या मुख्य रस्त्यापर्यंत गांवाचें शिवार उतरत गेलेलें होतें.

उमाठ्यावरून सूर्यनारायणाचें लालभडक गरगरीत बिंब वर चढूं लागलें तसें सगळें गांव स्वच्छ दिसूं लागलें. मुरारीला गांवाचें स्पष्ट होत चाललेलें रूप पाहून आनंद झाला नाहीं. सगळें शिवार बुच्चें दिसत होतें. जरा कोठें हिरवें नाहीं कीं सावली नाहीं. गांवापासून सडकेपर्यंत गेलेल्या निरुंद वाटेवर कमरभर खोल खड्डे पडलेले होते आणि तिकडे निघालेल्या गाड्या ठणाठण आपटत चालल्या होत्या. पांझरीच्या ओढ्यावर गांवाच्या उत्तरेला चिंचेचा डोह होता, तेथें बारा माही हवें तेवढें पाणी असावयाचें, पण तेंहि यंदा आटलेलें दिसत होतें. गांवचीं बायाबापई माणसें डोक्याखांद्यांवर घडेकावडी घेऊन ओहोळांत ठिकठिकाणीं झुरक्या खणल्या होत्या तिकडे निघालीं होतीं, आणि गांवांतलीं गुरेंढोरें केकताड्याच्या कुंपणांतून व तरवडाच्या झुडपांतून उगीचच मुस्कट खुपसून कांहीं मिळतें का पाहात होतीं. मुरारीनें पाहिलें तों चिंचेच्या डोहाजवळील चिंचेचीं, जांभळीचीं, कवठाचीं व आंब्याचीं थोर थोर झाडेंहि बरींच तुटलीं होतीं. त्यामुळें सदा पानाआड लपलेलें बनेश्वराचें पुराणें देऊळ उघडें पडल्यासारखें दिसत होतें, आणि तो ज्या टेकडावर उभा होता तेथली व पलीकडच्या गुरचरणांतली झाडीसुद्धां खूपच पातळ झालेली होती. मारुतीच्या देवळाशेजारीं शाळेची छोटीशी इमारत होती, तिच्यावरचीं कौलें विस्कटलेलीं दिसत होतीं. हें आपलें उजाड होत चाललेलें गांव

पाहून मुरारीला बरें वाटलें नाहीं. त्याच्या डोळ्यांना इटलींत पाहिलेलीं गांवें पुन्हा दिसूं लागलीं. जपानमधील चित्रासारखीं दिसणारीं शेतें–घरें त्याला आठवूं लागलीं. त्याला उदास वाटूं लागलें. मग तो फार वेळ टेंभावर थांबला नाहीं. घराकडे परततांना तो मनांत म्हणत होता, " हें सगळं बदललं पाहिजे. "

पण लगेच मन त्याला प्रश्न करीत होतें,

" बदललं पाहिजे हें खरं; पण तें व्हावं कसं ? "

---

## ३. कामास सुरुवात

मुरारी परतल्याला आतां आठ दिवस होऊन गेले होते. गेल्या आठ वर्षांत काय काय उलाढाली गांवांत झाल्या आहेत त्याची बरीचशी कल्पना निरनिराळ्या मंडळींशीं बोलून त्याला आली होती. त्याचें आदबशीर बोलणें-चालणें, त्याला आलेले अनुभव ह्या सर्वांचा परिणाम गांवकऱ्यांवर हळूहळू होत होता. न सांगतां सवरतां त्याला ते गांवांतल्या प्रतिष्ठित माणसांत गणूं लागले होते. त्याला आपल्या अडचणी सांगूं लागले होते. त्याची सल्ला विचारूं लागले होते.

रोज रात्रीं दहापांच गांवकरी मंडळी मारुतीच्या देवळांत शिळोप्याच्या गप्पा मारायला जमत तशी त्या दिवशींहि जमली होती. अधूनमधून मुरारी तेथें जाऊन बसे. त्या दिवशींहि तो मारुतीच्या देवळांत गेला होता. इकडच्या

तिकडच्या गप्पा सुरू होत्या इतक्यांत कांहीं तरी आरडा-ओरड ऐकूं आली. कुलकर्ण्यांच्या तात्यानें जरा कान दिल्यासारखें केलें आणि तो म्हणाला, " म्हारवाड्याकडून आवाज येतोय. काय आहे काय कीं ! "

यशवंतराव कदम देवळाच्या तटबंदीवर चढून म्हणाला, " म्हारवाड्यांत कांहीं तरी जळित झाल्यागत दिसतंय. धुराचे लोट चालल्यात. "

मुरारी लगेच उठला. तेथें जमलेल्या मंडळींना म्हणाला, " चला, आपण सगळे जाऊं नि विझवून टाकूं आग. "

एक शिष्ट देवळाच्या थंड फरशीवर पसरले होते. ते पडल्या पडल्याच म्हणाले,

" आपण पोचेस्तवर निम्म्याशिम्म्या खोप्या जळून जातील. तीं काय दगडाचुन्याचीं घरं आहेत थोडींच ? गवताच्या खोप्या त्या, कापरासारख्या भुर्रकन् जळून जायच्या...त्यांतून वस्ती म्हारड्यांची...दर वर्षींचंच आहे तें. "

पण त्याचें संपेपर्यंत मुरारी थांबला नाहीं. " येणार ते या, मी होतों पुढं. " इतकेंच बोलून तो बैठक सोडून गेला.

मुरारी एवढ्या सणकेनें निघून गेलेला पाहतांच तात्या कुलकर्णीहि निघाला आणि " अरे थांबा, मी येतों, " म्हणून यशवंतराव कदमानें भिंतीवरून खालीं उडी घेतली. महारवाड्याशीं खूप गर्दी जमली होती. शिवा महाराच्या खोपटाला आग लागली होती. शिवा कोठें परगांवीं गेला होता. त्याची बायको बाहेर डोक्यावर थाडथाड हात मारून घेत होती आणि ओक्साबोक्शी रडत होती. तिचें चार



Goray

वर्षाचें पोर आंत अडकलें होतें. शिवाचें घर लवकर विझविलें नाहीं तर सगळा महारवाडा जळून भस्म होणार होता आणि कदाचित् कुंभारवाड्यालाहि झळ लागणार होती. जवळच्या शेतांतून कदमांच्या गवताच्या गंजी होत्या. कांहीं तरी चटकन् केलें पाहिजे असें सर्वांनाच वाटत होतें. पण काय करावें तें एकाला सुचेल तर शपथ. इतक्यांत मुरारी तेथें येऊन पोचला; आणि शिवाचें मूल आंत अडकलेलें आहे असें समजतांच एक भलें थोरलें जाजम अंगाभोंवतीं लपेटून घेऊन तो सरळ त्या जळत्या खोपटांत शिरला. सारी बघी मंडळी श्वास रोखून पाहूं लागली. दीड दोन मिनिटांच्या आंत मुरारी परत आला आणि भेदरून गेलेलें तें पोर त्यानें ऊर पिटीत बसलेल्या आईच्या पदरांत टाकलें. पोर उराशीं घट्ट कवळून धरून शिवाच्या बायकोनें मुरारीकडे भरल्या डोळ्यांनीं पाहिलें आणि "तुज्या रूपानं इट्ठ्ल्बाराया आला र माज्या हाकेला धाऊन!" असें म्हणून तिनें कानशिलावर बोटें मोडलीं. पण कौतुक करून घेण्यासाठीं तेथें मुरारी थांबला नाहीं. सदू कुलकर्ण्याला आणि यशवंतरावाला बरोबर घेऊन तो पुन्हा शिवाच्या झोपडीकडे गेला आणि दुसऱ्या झोपडीला खेटून असलेला शिवाच्या झोपडीचा भाग त्या तिघांनीं अगोदर तोडून खालीं पाडला. मग जळितावर माती फेकून त्यांनीं आग आटोक्यांत आणली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुरारीच्या ओसरीवर गांवकऱ्यांची जशी कांहीं सभाच भरली होती. त्याच्या

चौकशीसाठीं सगळा महारवाडा लोटला होता. जळितं विझवीत असतांना मुरारीचें अंग मधून मधून पोळलं होतं. पण तो चांगला हुशारींत होता.

हिंमतराव म्हणाले, "मुरारीनं शर्थ केली काल. सैन्यांत तूं कशी बहादुरी गाजवली असशील तें काल प्रत्यक्ष पाहिलं. यशवंतरावांनीं व तात्याबांनींहि मोठी हिंमत दाखविली."

त्यावर मुरारी जरा हसून म्हणाला,

"पण आमची बहादुरी दिसायची म्हणजे अशीं जळितं वरचेवर व्हायला पाहिजेत!"

लखू सोनार म्हणाले,

"असलं वळशाचं बोलणं आम्हांला उमगत नाहीं. सरळ काय तें बोल."

मुरारी जरा सावरून बसला नि म्हणाला,

"तुम्ही बोल म्हणतां तर बोलतों. आमच्या अंगांत ढीग बहादुरी आहे. आम्हांला खूप करावंसं वाटतं. पण त्याचा उपयोग काय? आपल्या ह्या साळगांवची काय दशा झाली आहे? माणसां-गुरांना प्यायला पाणी नाहीं. शेती पिकत नाहीं. चांभारटेंभावर कशी हिरवीगार राई होती ती पार तुटून गेली. बनेश्वराचें देऊळ उघडें पडलें. हें सगळें पाहिलें कीं वाटतें कीं, जगांतल्या इतर देशांतलीं खेडीं कशीं आणि आपलं हें साळगांव कसं? हें बदललं पाहिजे....!"

बजाबा म्हणाले,

"आम्हांलाहि साळगांव खचत चालला हें दिसतंय, पण उपाय सुचत नाहीं. ईश्वर कोपला तिथं आपण माणसं

२९९९८ ग्रा.वा. २१६ ३-२-

काय करणार? त्याच्या मर्जीस येईल तसं होईल! हें नारूचं दुखणं घ्या. चार वर्षांपासून गांवांत हें उपटलंय. पूर्वी ह्या गांवाला नारू ठाऊक नव्हता. आतां घरटीं एकजण कोकलत बसलाय! हा ईश्वरी कोप नाहीं तर दुसरं काय!"

मुरारी म्हणाला, "वजाबा, मी जरा स्पष्ट बोलतों माफ करा. ईश्वर आपल्यावर कशाकरितां कोपलाय नि इतर देशांवर काय म्हणून प्रसन्न झालाय? आपण काय दररोज पापाच्या उतरंडी रचतों आणि इतर देशांतले लोक काय पुण्याच्या राशी घालतात? तुम्हीं नारूचा दाखला दिलांत. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करा मग बघा नारू होतो का? आमच्या दैन्याचा नि ईश्वराचा कांहीं संबंध नाहीं."

"मग आपली अशी पिछेहाट काय म्हणून होत्येय?" हिंमतरावांनीं मध्येंच प्रश्न केला.

"आपण पुढें सरत नाहीं म्हणून!"

"म्हणजे? मी नाहीं समजलों."

"म्हणजे आपण काम करण्याचा आळस करतों म्हणून. आपण आपआपलं काम जसं मन लावून करतों तसं प्रत्येकानं गांवकीचंहि थोडंसं काम केलं पाहिजे याचा आपणाला विसर पडला म्हणून!"

"गांवकीचं काम करायचं म्हणजे काय करायचं मुरारी?"

"गांवकीचीं कामं हवीं तेवढीं आहेत, पण नमुन्यासाठीं दोन तीनच सांगतों. सडकेपर्यंतची वाट दुरुस्त करायची. काम नंबर एक. पोरांची शाळा मोडायला आलीय ती चांगल्या जागीं नवी बांधायची. काम नंबर दोन; आणि

चांभारटेंभावर व बनेश्वराजवळ झाडं लावायचीं. काम नंबर तीन."

जरा वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं. मग बजाबा म्हणाले,

"कामं महत्त्वाचीं आहेत; पण त्याला पैसा कोठला आणायचा?"

"पैसा? आपले हातपाय हा पैसा. घरटीं एक मनुष्य द्यायचं, एक कुदळ, फावडं नि घमेलं आणायचं नि कामाला करायची सुरुवात. मग निराळ्या भांडवलाची जरूरी नाहीं!"

पुन्हा शांतता पसरली. मग हिंमतराव सगळ्यांच्याकडे नजर टाकून म्हणाले,

"ऐकलं का मंडळी मुरारी काय म्हणाला तें? आहे का तुम्हांला पसंत?"

"एकदम पसंत." यशवंतराव म्हणाला.

"मग केव्हां करायची सुरुवात?"

"धरा पाडव्याचा मुहूर्त!"

"रामनवमीला पारंबीला जायचं तें नव्या रस्त्यावरून, काय?" तात्या बोलला.

ठरल्याप्रमाणें पाडव्याच्या दिवशीं शंभर माणसें आलीं. कुदळीं, फावडीं, घमेलीं आलीं. मुरूम वाहण्यासाठीं तीन-चार गाड्या आल्या. लोक उत्साहानें कामाला लागले. गांव-कऱ्यांनीं गांवचा रस्ता करायचा. त्यांना हा अनुभव नवीनच होता. तात्या, यशवंतराव व मुरारी यांनीं अगोदर आंखणी करून खुंट्या मारून ठेवल्या होत्या. दोन्ही अंगांनीं दोन दोन

हात रस्ता वाढविला होता. गटारें काढलीं होतीं. आखणी-बरहुकूम पांचपन्नास हात दररोज रस्ता बनूं लागला. दगड-मुरूम पडून खड्डे भरून निघाले. दोन गाड्या आमने सामने आल्या तर पूर्वी पंचाईत पडे. आतां त्या सुखानें जातील एवढी वाट झाली. काम मार्गी लागलें तशीं तशीं आणखी माणसें त्यांना येऊन मिळूं लागलीं. शाळा सुटली कीं सगळीं पोरें येत आणि रस्त्याच्या पायासाठीं लागणारे दगडधोंडे चांभारटेंभावरून घेऊन येत. काम करतांना तीं गाणें गात :

" भाग्यवान् धरतीचीं आम्ही लेकरं ॥ धृ० ॥
शेतावर जाऊं या,
सांगातीं गाऊं या
रानिंवनीं गात जशीं फुलपांखरं ॥ १ ॥
शाळू, जुंधळा, मोती
चम्‌चम् चमकत्याती
मोत्याची सालभरी खाऊं भाकर ॥ २ ॥
स्थापूं समानता
पोलादी एकता
नाहीं धनी, नाहीं कुणी येथ चाकर ॥ ३ ॥
भाग्यवान् धरतीचीं, आम्ही लेकरं ॥ "

मुलें हें गाणें तालासुरांत म्हणूं लागलीं कीं हळू हळू कामावरचे सगळेच गांवकरी म्हणूं लागत आणि त्यांचे हात भराभर चालूं लागत. सगळें वातावरण गाण्यानें भरून जाई.

झालें. शेवटीं अष्टमीला चंद्रोदयाच्या सुमाराला साळ-गांवचा मुख्य फाटा सडकेला जाऊन मिळाला, तसा

गांवकऱ्यांनीं जय हिंदचा एकच जयघोष केला. पोरांनीं घमेलीं वाजविलीं आणि आरोळ्या ठोकल्या. मग दुसऱ्या दिवशीं पारंवीच्या रामनवमीच्या रथासाठीं साळगांवचीं पंचवीस गाडी, मारे बायका पोरें घेऊन, बैलांच्या अंगावर झुली घालून, जयघोष करीत नव्या रस्त्यानें जेव्हां निघाली तेव्हां सडकेवरून मोटारींतून जाणारे वाटसरू अचंबा करूं लागले कीं आज ह्या साळगांवकरांना झालें आहे तरी काय?

---

## ४. शाळा बांधली

रस्त्याचें काम पुरें केल्यामुळें गांवकऱ्यांना जसा उत्साह वाटूं लागला होता तसाच त्यांचा आत्मविश्वासहि वाढला होता. पण रस्त्याच्या कामाइतकें शाळेचें काम सोपें नव्हतें. शाळेसाठीं जागेपासून शोधाशोध करावयाची होती. दगड, विटा, चुना, पत्रे, लाकडें सगळें जमवणें जरूर होतें. शेवटीं ह्या सगळ्या गोष्टींचा निर्णय करण्यासाठीं मारुतीच्या देवळांत गांवकऱ्यांची बैठक भरली. पहिला प्रश्न होता कीं नव्या शाळेसाठीं जागा कोणती?

एकानें ही जागा सुचवली तर दुसऱ्यानें ती सुचवावी असें चाललें होतें. शेवटीं कृष्णा सुतार म्हणाला, "गुरचरणाच्या वयल्या अंगाला चांगला माळ हाय; ती जागा बेस हाय साळला!" कृष्णा साताऱ्याला भाऊराव पाटलांचें कॉलेज पाहून आला होता. त्यामुळें ही कल्पना त्याला

सुचली. गांवकऱ्यांना पण कृष्णाची सूचना पसंत झाली. मग प्रश्न आला दगडांचा.

त्यावर सदू तेल्यानें सुचवलें, "देशमुखाचा वाडा ओस पडलाय गेलीं पन्नास वर्षं, त्याचे दगड काढले तर त्याचं नांव सांगणारं सुद्धां कोणी उरलेलं नाहीं."

कल्पना चांगली होती. पण इतक्या जुन्या वास्तूचा चीर हालवणार कोण? बजाबा रागावून म्हणाले,

"तुम्ही पोरं शेफारलांत. वास्तूला हात लावील त्याचं निर्वंश होणार ही काळ्या दगडावरची रेघ. संकटाला बोलावणं करण्यांत काय शहाणपण आहे?"

मुरारी इतका वेळ कांहीं बोलला नव्हता. तो निश्चयी स्वरांत म्हणाला,

"माझा होऊं दे निर्वंश. माझ्या बाबाला अजून मस्त चार मुलगे आहेत. मी हाणीन पहिली कुदळ. तेव्हां दगडांचा प्रश्न सुटला समजा. आतां लाकूड-पत्र्यांचा विचार करा."

मग पुष्कळ खल होऊन असें ठरलें कीं हिंमतराव, मुरारी व तात्या यांनीं जिल्ह्याच्या शहरीं जाऊन स्कूलबोर्डाच्या प्रमुखांना भेटावें व आर्थिक मदत मिळवावी. त्याप्रमाणें ते तिघे गेले आणि प्रमुखांना भेटले. तो प्रथम पुष्कळ सबबी सांगूं लागला. तुम्ही स्वश्रमानें शाळा बांधाल कशावरून, अशी शंका त्यानें काढली. आणि मग जेव्हां त्याला कळलें कीं साळगांवचा फाटा एका आठवड्यांत तयार करणारी मंडळी ती हीच, तेव्हां तो राजी झाला.

खूप आनंदून मंडळी परत साळगांवला आली. शिदू सुताराच्या पुतण्यानें, कृष्णा सुतारानें शाळेचें लाकूडकाम फुकट करायचें कबूल केलें.

देशमुखांच्या पडक्या वाड्याचा चिरा मुरारी काढणार असें कळतांच तो देखावा पाहण्यासाठीं गांव लोटला. बाबाजीनें आणि मुरारीच्या म्हातारीनें खूप समजावणी केली, पण मुरारीनें त्यांचें बोलणें कानामागें टाकलें. जो जो माणूस त्याला भेटे तो तो त्याला म्हणे, "कशाला ही आगळीक करायची? मरेना ती शाळा. आतांपर्यंत पोरांचं लिवणं सवरणं खोळंबलं का होतं? शिकायचें ते पडक्या शाळेंत बसूनहि शिकले, राहिले नाहींत; आणि नवी शाळा बांधली म्हणून कांहीं लंबकर्णाचे श्यामकर्ण व्हायचे नाहींत. मग काय म्हणून ही बला ओढवून घेतां?"

मुरारीनें त्या सगळ्यांना वाटेला लावलें होतें. तो म्हणायचा,


"वाड्यांत माणसं नि गुरंढोरं दिवसाढवळ्या घाण करताहेत तर देशमुखांची वास्तुदेवता रागावत नाहीं आणि मी वाड्याचे चिरे विद्यामंदिरासाठीं वापरतोंय तर ती माझ्यावर रागवेल होय? कांहीं तरी खुळ्या कल्पना धरून बसलोंय आपण उराशीं. त्यामुळं कामं मात्र अडून राहिलीं आहेत. हाताशीं दगड आहे तो वापरायचा नाहीं, नि पोरांना बसवायचं त्या कुजक्या शाळेंत. हें आपल्याला पटतच नाहीं मुळीं!"

सगळी मंडळी मंत्रानें भारल्यासारखी उभी राहून पाहात

होती. तों शांत मनानें मुरारी पुढें झाला आणि त्यानें अस्तन्या मागें सारल्या.

त्यानें जरा हसून सगळ्यांच्याकडे पाहिलें आणि कुदळ चालवून देशमुखांच्या जोत्याचा पहिला दगड काढला. मग शंपन्नास माणूस पुढें झालें आणि उत्तम माठीव असे शेंकडों चिरे त्यांनीं शाळेसाठीं निखळून काढले. बोर्डाची मदत मिळून चुना, सिमींट, पत्रा, वगैरे सामान वेळेवर मिळालें. मग काय विचारतां? चार मोठ्या खोल्यांची, सभोंवार एक एकराचें मोकळें मैदान असलेली टुमदार अशी शाळेची इमारत पावसाळ्याच्या आधीं गांवकऱ्यांनीं उभी केली. इमारतीची जागा साफ करण्याचें, पाया खोदण्याचें, गवंड्यांच्या हाताखालीं घमेलीं देण्याचें, शाळेच्या भिंतींना चुना देण्याचें काम विद्यार्थ्यांनीं गटा-गटांनीं केलें होतें. त्यामुळें शाळेच्या उद्घाटनाच्या समारंभाला आलेल्या जिल्हाप्रमुखांनीं जेव्हां गांवकऱ्यांचें आणि विशेषेंकरून विद्यार्थी बाळगोपाळांचें कौतुक आपल्या भाषणांत केलें तेव्हां सगळ्या मुलांना अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें वाटलें.

गांवांतलीं तरुण माणसें आणि मुलें तर आतां मुरारीच्या सदैव आवर्तीभोंवतीं राहूं लागलीं. त्याला दादा म्हणूं लागलीं. शाळेचा समारंभ पार पडल्यानंतर एक दिवस त्याला त्यांनीं विचारलें, "दादा, रस्ता झाला, शाळा झाली, आतां कांहीं तरी नवं काम काढा. बसून कंटाळा येतो."




शाळेचें बांधकाम जोरांत सुरु झालें.

मुरारी म्हणाला, “ आतां कांहीं दिवस रजा. फार काम केलं तर कामाचंसुद्धां अजीर्ण होतं ! ”

सगळेजण हसूं लागले.

मुरारी म्हणाला, “ मीं थट्टा नाहीं केली. खरंच सांगितलं. आतां पावसाळा संपेपर्यंत मोठं काम काढायचं नाहीं. ”

“ मग काय करायचं ? ”

“ छोटं काम. ”

“ पण छोटं काम म्हणजे तरी काय ? ”

“ अरे हो, हो. ऐकाल तर खरं ! छोटं काम म्हणजे असं कीं बनेश्वराच्या देवळाभोंवतीं, शाळेच्या आवारांत, चांभारटेंभावर आणि फाऱ्याच्या कडेला खूप झाडं लावायचीं पहिला पाऊस झाल्याबरोबर. पहिलीपासून तिसरी-पर्यंतच्या विद्यार्थ्यांनीं शाळेच्या आवारांत झाडं लावायचीं. चौथी व पांचवीच्या विद्यार्थ्यांनीं चांभारटेंभावर लावायचीं, सहावी सातवीच्या विद्यार्थ्यांनीं बनेश्वरजवळचीं लावायचीं, आणि मोठ्या माणसांनीं फाऱ्याच्या कडेला झाडं लावायचीं. ”

“ पण आमचा अभ्यास नाहीं का बुडणार ? ” एका सातवींत जाणाऱ्या विद्यार्थ्यानें विचारलें.

“ एका आठवड्यांत असा कितीसा अभ्यास बुडणार आहे ? ” मुरारीनें विचारलें. “ एका आठवड्यांत सर्व कार्यक्रम उरकून टाकायचाय आपला. ”

“ पण मग झाडांना पाणी घालावं लागेल तें दररोज ? ” दुसऱ्या मुलानें शंका विचारली.

"असलीं नाजुक झाडें लावावयाचींच नाहींत आपल्याला. आपण झाडं लावणार आहोंत. वड, पिंपरी, गुलमोहोर, आंबा, आकाशलिंब, चिंच, कवठ, करंज, जांभूळ अशा जातीचीं. म्हणजे फारशी निगा न राखतां झाडं वाढतात, आणि...."

"आणि चिंचा, कवठं, आंबे खायला मिळतात." मध्येंच एक मुलगा म्हणाला.

"कां, तुझ्या तोंडाला एव्हांपासूनच पाणी सुटलं ना गोविंदा?" मुरारीनें थट्टेनें विचारलें. "पण एव्हांपासून खड्डे खणून ठेवले पाहिजेत बरं का! दोन अडीचशें तरी खड्डे घ्यायला लागतील."

"आणि एवढ्या झाडांचीं रोपें कोण आणणार?"

"त्याची नको काळजी." तात्या म्हणाला, "आम्ही जंगलखात्याकडून रोपं आणण्याची करूं व्यवस्था."

मृगाचा पाऊस चांगला लागूं लागला तशी मोठ्या माणसांची शेतीची घाई सुरू झाली आणि मुलांचीं झाडें लावण्याची घाई सुरू झाली. आकाशलिंबाचीं व गुलमोहोराचीं झाडें त्यांनीं शाळेच्या आवारांत लावलीं. चांभारटेंभावर चिंचेचीं, कवठाचीं, जांभळाचीं व करंजांचीं रोपटीं लावण्यांत आलीं. वनेश्वराच्या देवळाच्या आवतीं भोंवतीं व फाट्यावर दुतर्फा आंब्याचीं रोपें व पिंपरी-वडाचे खुंट लावण्यांत आले. वनेश्वराच्या आवारांत दोन चार बेलाचीं झाडें लावण्यासहि मुरारी विसरला नाहीं.

---

92484

## ५. नांव सार्थ केलें !

मुरारीच्या मार्गदर्शनाखालीं साळगांवचें रूप हळूहळू बदलत होतें. त्याची हळूहळू प्रगति होत होती. मुरारीच्या प्रेरणेनें गांवकऱ्यांनीं सहकारी विविध कार्यकारिणी संस्था सुरू करून रेशनचे पदार्थ, कापड इत्यादि वस्तु विकण्यास तर सुरुवात केलीच, पण पेंड, खतें, नांगर, गाडीचीं चाकें, पत्रे असले शेतकऱ्यांना लागणारे अवजड पदार्थहि आणावयास व अल्प नफा घेऊन विकण्यास प्रारंभ केला. अशीं चारपांच वर्षें उलटलीं. तेवढ्या अवधींत साळगांवांतले रस्ते सरळ नीट झाले. घरांतील सांडपाणी रस्त्यांतून वाहणें बंद झालें, शौचासाठीं दोन चार ठिकाणीं आडोसे उभारण्यांत आले. कंपोस्टचे खड्डे खणण्यांत आले, पंचायतीचें काम सुरळीत सुरू झालें, शाळा भरगच्च चालूं लागली. पण मुरारीच्या मनाचें अजून समाधान झालें नव्हतें. एकदां तो तालुक्याच्या गांवीं रेशनमध्यें खराब धान्य मिळालें म्हणून तक्रार करावयास गेला असतां मामलेदार त्याला खोचून म्हणाले होते,

"तुमच्या गांवाचं नांव साळगांव म्हणून सांगतां नि सणावाराला तरी छटाक अदपाव तांदूळ द्या म्हणून तोंड वेंगाडतां ? आश्चर्य आहे. साळगांवांत साळ पिकत नाहीं. म्हणजे सोनुबाईच्या हातीं कथलाचा वाळा असलाच प्रकार दिसतोय !"

आणि आपल्या कोटीवर स्वतःच खूष होऊन मामलेदार हाः हाः हीः हीः करून हसले होते.

मुरारीच्या मनाला मामलेदारांचा तो विनोद फार लागून राहिला. घरीं आल्यावर त्यानें आपल्या वडलांना व भावांना विचारलें तेव्हां त्यांनीं अडचण सांगितली कीं मावळ भागांतलें गांव असल्यामुळें भरघोस भात पिकायला हरकत नव्हती. पण पावसाची हमी कोण देणार? चार दिवस पाऊस उडाला कीं भातशेती गेली जळून. तेव्हां पाण्याचा पुरवठा असल्याशिवाय भाताच्या पिकाची गोष्ट करण्यांत अर्थ नाहीं.

"गेलीं चार वर्षं तूं पाहतोच आहेस ना?"

"बरं ओढ्याचं पाणी घेतलं तर?"

"पण घेणार कसं? पाणी खालच्या मजल्यावर आणि आमची शेती वरच्या मजल्यावर अशी आपल्या गांवची मांडणी आहे. पंप आणावा तर परवडत नाहीं."

"मग पाणी अडवावं आणि पाट काढून फिरवावं शेतांतून." मुरारी म्हणाला.

"पण मुरा, हे सगळे पैशाचे खेळ. हजारोंनीं खर्च येणार पाणी अडवायचं म्हटल्यावर, त्यांची काय तरतूद?"

पैशाचा प्रश्न होता खरा. पण मुरारीनें पाणी अडवण्याची कल्पना सोडली नाहीं. यशवंतरावाला व सदूला घेऊन तो गुरचरणापासून सडकेपर्यंत ओढ्याचा प्रवाह पाहून आला. दोन ठिकाणीं पाणी अडवण्यासारख्या जागा त्यांना आढळून आल्या. एक गुरचरणाखालीं आणि एक बनेश्वराच्या देवळाजवळ. नदी मुरडून पारंबीच्या शिवारांत घुसली होती तेथें. पाण्याच्या सांठ्याच्या दृष्टीनें बनेश्वराजवळची जागा खूपच उजवी होती. पण गुरचरणापासली जागा

अधिक उंचावर होती. बनेश्वरापेक्षां तेथें कमी उंचीचा बंधारा पुरला असता. मुरारीची कल्पना अशी कीं दोन्ही ठिकाणीं पाणी अडवावें. पावसाळ्यांत पावसानें ताण दिला तर भातशेतीला तेथून पाणी द्यावें. नंतर भाजीपाला, कलिंगडें, गुरांचा घास आणि कांहीं मोजक्या जमिनीवर दुसवळ्याचें भात अशीं पिकें काढावींत. पण ह्या पुढच्या कल्पना झाल्या. आधीं धरणें उभीं राहावयाचीं कशीं? दोन्ही धरणें मिळून गेला बाजार पन्नाससाठ हजारांचा प्रश्न होता.

देव-दिवाळीच्या दुसऱ्या दिवशीं बनेश्वराच्या सभामंडपांतच गांवकऱ्यांची सभा भरली होती. सगळे मुख्य मुख्य लोक आले होते. यशवंतराव आतां चांगला तयार झाला होता. त्यानें गांवकऱ्यांना धरणांची योजना समजावून सांगितली.

"हीं दोन धरणं झालीं तर एक शाळेखालून आणि दुसरें बनेश्वराच्या पाणवठ्यापासून असे दोन पाट काढून गांवची पावसाळी शेती तर सगळीच बिनधोक करतां येईल, आणि उन्हाळी पीकहि कांहीं ठिकाणीं निघेल...."

लखबा सुतार आपला नारूचा पाय घेऊन जरा दूर बसला होता तो जरा चिडक्या आवाजांत म्हणाला, "तुझ्या शेताला लागून पाट जाणार आणि तुझं शेत धरणाजवळ म्हणून तूं उड्या मारतो आहेस. पण उन्हाळ्यांत आमच्या शेताला त्याचा काय उपयोग? आमच्या शेतापर्यंत पाणी पोचतंय कशाला?"

लखबाचें म्हणणें खरें होतें. त्याला आणखी बऱ्याच लोकांनीं साथ दिली. यशवंतरावाला त्यावर उत्तर सुचेना. तो सदूच्या तोंडाकडे बघूं लागला. सदू मुरारीच्या तोंडाकडे बघूं लागला. मुरारीलाहि चटकन् कांहीं सुचेना. तो गप्प बसला. सभेंत गडबड सुरू झाली. लोक चूळबूळ करूं लागले. शेवटीं मुरारी उठून उभा राहिला. तो म्हणाला,

"लखबांचा आक्षेप खरा आहे. ह्या दोन धरणांमुळें पावसाळ्यांत भरपूर पाणी मिळून सगळ्यांना त्याचा फायदा होईल हें खरें. पण उन्हाळी पिकासाठीं सगळ्यांना पाणी मिळणार नाहीं. आतांपर्यंत आपण सगळ्यांच्या फायद्याचं जें असेल तेंच करीत आलों. तेव्हां ह्या धरणाच्या पाण्याचा फायदा सगळ्यांना मिळणार असेल तरच धरणाचा विचार करावयाचा, नाहीं तर नाहीं. आज तर मला कांहीं तोड सुचत नाहीं. मी आणखी विचार करतों. सल्लामसलत घेतों. कांहीं तोड निघाली तर मी तुम्हांला पुन्हां बोलावून घेईनच. सध्यां आपण एवढ्यावरच थांबूं या."

एवढ्यावर त्या दिवशींची सभा संपली. पण मुरारीच्या व त्याच्या मित्रांच्या प्रांजलपणाच्या वर्तनामुळें वातावरण बिघडलें नाहीं.

मग मुरारीनें आपल्या मित्रांसह म्हणजे यशवंतराव तात्या नि शिदबा सुताराचा पुतण्या कृष्णा सुतार यांच्यासह खूप विचार केला. एकदां दोनदां ते तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या गांवीं हेलपाटे मारून आले. शेवटीं दोन तीन आठवड्यांनीं त्यांनीं पुन्हा गांवकरी मंडळींना सभेसाठीं

बोलावलें. सभेच्या सुरवातीलाच हिंमतराव थोड्याशा उपरोधाच्या सुरांत म्हणाले,

"हं काय मुरारबा, आणलंय का कांहीं पोतडींतून? कीं आजहि रिकाम्या हातांनींच परत आलांत?"

पोतडी खोलणारच आहे क्षणाभऱ्यांत." असें म्हणून मुरारी उभा राहिला. तो बोलूं लागला,

"उन्हाळी पाण्याचा फायदा सगळ्यांना मिळणार नाहीं म्हणून मागची बैठक आपण तहकूब केली. ह्या खेपेस मी तुमच्यासमोर दुसरी एक योजना मांडतों ती पटते का पाहा. दोन्ही धरणांपैकीं वरचें धरण उन्हाळ्यांत फारसें उपयोगी नाहींच, तेव्हां तें आपण उन्हाळ्यांत पिण्याच्या पाण्यासाठीं व गुरांढोरांसाठीं राखून ठेवूं या. मुख्य प्रश्न आहे बनेश्वराच्या धरणाचा. त्या बाबतींत माझी योजना अशी कीं, आपण गांवाची एक सहकारी शेती संस्था स्थापूं या, आणि तिच्यामार्फत उन्हाळी पीक काढूं."

"म्हणजे काय?" हिंमतरावांनीं प्रश्न केला.

"तेंच तर सांगतोंय. सहकारी शेती संस्था म्हणजे असं कीं प्रत्येकीं दहा रुपयांचा भाग घेऊन संस्थेचे सभासद होण्यासाठीं जे तयार असतील त्यांनीं एक संस्था स्थापायची, आणि जेवढ्या जमिनी बनेश्वराच्या धरणाखालीं भिजणार असतील त्या खंडानं घेऊन त्यावर पीक काढायचं. नाहीं तरी सध्यां खरीप पीक काढल्यावर जमिनी मोकळ्याच पडलेल्या असतात. तेव्हां त्या सहकारी संस्थेकडे खंडानं द्यायला काय हरकत आहे? सहकारी संस्था धरणासाठीं

सरकारकडून मदत मिळवील, जमिनींना कुंपण घालील, पिकं काढील, गांवांतल्या लोकांना शेतावर नेमून मजुरी देईल, हंगामाच्या शेवटीं नफा झाला तर भागीदारांना मिळेल. म्हणजे पाण्याचा फायदा चार-दोघांनाच मिळाला आणि ते तेवढे गब्बर बनले असं व्हायला नको."

"पण ज्यांच्यापाशीं भाग घ्यायला पैसे नाहींत त्यांनीं काय करावं? ते राह्यलेच कीं बाहेर!"

"बाहेर राहण्याची जरूरी नाहीं. त्यांनीं मणमण धान्य द्यावं."

"तेंहि नसलं तर?"

"तर आठवडाभर फुकट मजुरी करावी म्हणजे आम्ही दहा रुपये पावले असं समजूं."

ह्या खुलाशानें मंडळींची समजूत पटल्यासारखी दिसली. कारण आणखी शंका कोणी विचारल्या नाहींत.

"बरं, हें झालं पाटाखालीं येणाऱ्या जमिनीबद्दल. पण धरणाचा खर्च कुठून करायचा?"

"तें सरकारनं कबूल केलं आहे. आपण सर्वांनीं अंग-मेहनत करण्याची मात्र तयारी ठेवली पाहिजे."

एवढा खुलासा केल्यावर मुरारी थांबला. कोणी कांहीं आक्षेप घेतो का तें त्याला पाहावयाचें होतें. पण कोणी बोललें नाहीं तेव्हां तात्या कुलकर्णी म्हणाला, "मग काय ठरला बेत गांवकऱ्यांचा? सरकारला कळवायचं का आपण तयार आहों म्हणून? काय लखोबा?"

मग लखोबासकट सर्वांनीं "कळवा" म्हणून सांगितलें.

## ६. सुजलाम् सुफलाम् !

महिन्याभरानें धरणाच्या कामाला प्रारंभ झाला. इंजिनिअर येऊन नकाशे काढून गेले. चांभारटेंभाच्या एका अंगाला चांगल्या दगडांची खाण मिळाली. तेथें सुरुंग लावून दगड फोडण्याचें काम सुरू झालें. बनेश्वराच्या वर गुरचरणापर्यंतच्या पात्रांत खूप वाळू होती ती काढल्यामुळें डोह आणखीच खोल बनला व वाळू बाहेरून आणण्याचे श्रम व पैसा वांचला. बाहेरून सिमिट, लोखंड हें सामान मात्र आणावें लागलें. बनेश्वरालगत वडारांची छावणी पडली. खडी व सिमिट कालवण्याचें यंत्र आलें. पाणी उपसण्याचा पंप आला. वरचें गुरचरणापासचें छोटें धरण आणि वरच्या व खालच्या धरणावरचे पाट गांवकऱ्यांनीं श्रमदान करून बनवण्याचें कबूलच केलेलें होतें. त्याप्रमाणें सकाळींच टोळयाटोळयांनीं ते कामावर जाऊं लागले. सगळा साळगांव गजबजून गेला. मुरारी, यशवंतराव, तात्या, कृष्णा यांच्या पायांना तर जशी कांहीं भिंगरी लावलेली होती !

पावसाळयाच्या आंत वरचें धरण गांवकऱ्यांनीं पुरें केलें. तेथें घरांत वापरण्याचें पाणी भरण्यासाठीं व गुरांढोरांना पाणी पाजण्यासाठीं वेगवेगळी सोय केलेली होती. धरणाच्यावर कोणी स्नान करायचें नाहीं आणि धुणें धुवायचें नाहीं असें ठरलें. गांवांत सरकारी डॉक्टरची फेरी येऊन गेली. त्याला ही व्यवस्था कळल्यावर तो हिंमतराव पाटलांना म्हणाला,

" म्हणजे पुढच्या वर्षापासून नारूसाठीं तुमच्या गांवांत यायला नको ! "

हिंमतरावांनीं विचारलें, " तें कां ? "

" स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय झाली. आतां नारू कशाला तोंड दाखवील ? "

पण अजून खालचें धरण व्हावयाचें होतें. अर्धेंच बांधकाम उरकलें होतें तों मृग डोक्यावर आले, कोसळूं लागले.

मुरारीनें इंजिनिअरांना विचारलें,

" आतां ? "

" आतां कांहीं नाहीं. आतां दसऱ्यानंतर कामाला पुन्हा सुरुवात करूं. एक पाऊस खाल्लान् तर धरणाला बरंच आहे. काम भक्कम होईल ! "

पावसाळ्यांत पुनर्वसूच्या नक्षत्रानें दगा दिला तेव्हां साळगांवच्या मंडळींना धरणाची किंमत कळली. गुरचरणाच्या धरणापाशीं पांझरीचें पाणी अडवून गांवच्या वरच्या अंगच्या शेतांना पाणी देतां आलें आणि त्यामुळें तेथील शेतांची निभावणी झाली. त्यामुळें तर खालचें धरण केव्हां पुरें होतें याची वाट गांवकरी उत्सुकतेनें पाहूं लागले. दसरा आला नि गेला तरी बांधकाम खात्याचीं माणसें आलीं नाहींत. दिवाळीहि गेली. तशी गांवकरी मंडळी अस्वस्थ झाली. मुरारीच्या मागें त्यांचा लकडा सुरू झाला कीं, " तूं जिल्हाकचेरींत जा आणि माणसें आणण्याची खटपट कर. " शेवटीं जातों म्हणून मुरारी गेला, जिल्हाकचेरीवर जवळ जवळ धरणेंच धरून बसला आणि पंधरा

दिवसांत माणसें येतील असें अधिकाऱ्यांकडून वचन घेऊन परत आला.

दहाव्या दिवशीं पुन्हा माणसें आलीं, इंजिनें आलीं आणि कामाला नेटानें सुरुवात झाली. गांवकऱ्यांना आतां धरण मनापासून हवें होतें त्यामुळें ते कांहीं उणें पडूं देत नव्हते. धरणाची भिंत झपाझप वर येऊं उठूं लागली. आखितीच्या सुमाराला धरणाच्या भिंतीचा अखेरचा थर पुरा झाला. पाट खोदून पुरे झाले. सगळी तयारी झाली होती. आतां गांववाले पावसाची वाट पाहात बसले.

आला. पाऊस आला. मृग झडूं लागला. पांझरी वाहूं लागली. धरणें भरूं लागलीं. धरणें तुडुंब भरून पाणी खालीं ओसंडूं लागलें. गुरचरणाजवळच्या आणि बनेश्वराजवळच्या जागेचा नूरच पार पालटून गेला. त्यांतल्या त्यांत बनेश्वराजवळचा देखावा तर रमणीय दिसूं लागला. धरणाच्या उरलेल्या सामानांतून बनेश्वराच्या राईत बांधकाम खात्यानें एक प्रशस्त चौथरा बांधून दिला होता. त्यावर बसून समोरच्या धरणाकडे आणि त्यांतील पाण्यांत उमटलेल्या देवळांच्या, झाडांच्या आणि आभाळाच्या पडछायांकडे पाहिलें कीं मन कसें शांत होई! बनेश्वराचें देऊळ पूर्वीं ओस पडलें होतें. आतां संध्याकाळच्या वेळीं तेथें स्त्रीपुरुष देवदर्शनाला येऊं लागले. शोभा वाढली तशी रहदारीहि वाढली.

शेवटीं देव-दिवाळीच्या दिवशीं मोठ्या समारंभानें धरणाचें पाणी पाटांत सोडावयाचें ठरलें. जिल्ह्यांतल्या

एका वृद्ध थोर सार्वजनिक कार्यकर्त्याला समारंभासाठीं बोलावण्यांत आलें. बनेश्वराच्या राईतच सभा भरवण्यांत आली. छत घालण्यांत आलें. पताका फडकल्या. साळगांवचें तर झाडून सारें मनुष्य आलें होतेंच, पण पारंवी, भादुली, निंबोणी वगैरे पंचक्रोशींतलीं प्रतिष्ठित माणसेंहि आलीं होतीं.

सुरुवातच मोठी फक्कड झाल्यामुळें समारंभाला प्रथम-पासून रंग भरूं लागला. कारण, शाळेंतल्या मुलांनीं पहिलें जें गीत म्हटलें त्यानें साऱ्या सभागतांचीं मनें हालवून टाकलीं. मुलें गात होतीं तें गीत असें—

तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून
उद्यां पिकल सोन्याचं रान
चल उचल हत्यार, गड्या होऊन हुश्यार
तुला नव्या जगाची आण ॥ ध्रु० ॥

तुझ्या घणाच्या घावामधून
उठे नव्या जगाची आस
तुझ्या घामाच्या थेंबामधून
पिके भुकेल्या भावाचा घास

तुझ्या श्वासामधून, तुझ्या ध्यासामधून
जुळे नव्या जगाचं गान ॥ १ ॥

तुझ्या पोलादी टांचेखालून
जित्या पाण्याचे निघतील झरे
तुझ्या लोखंडी दंडामधून
वाहे विजेची ताकद कीं रे

२९९९८ बा. वा. २७५८ ३-८-६७

चल मारूं धडक, उभा फोडूं खडक
आतां कशाची भूक तहान? ॥ २ ॥
भाग्य लिहिलेलं माझं तुझं
घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं
इथं भरड माळावरी
घेऊन कुदळ खोरं, चला जाऊं म्होरं
देऊं देशाला जीवन–दान" ॥ ३ ॥

साळगांवची गेल्या चार पांच वर्षांतली कहाणीच जणूं कांहीं त्या गीतांत सांगितली होती! गीतानंतर सर्व समारंभ यथासांग पार पडला. शेवटीं पाहुण्यांनीं योग्य शब्दांत साळगांवकरांची पाठ थोपटली आणि गेल्या पांच वर्षांत आपली प्रगति करून पंचक्रोशीलाच काय पण सगळ्या जिल्ह्याला तुम्हीं उदाहरण घालून दिलें आहे असें ते म्हणाले. शेवटीं मुरारीला त्यांनीं स्वतःच्या हातांनीं हार घातला तेव्हां ते म्हणाले,

"तूं खरा बहादूर. लढाईत शत्रूवर मात करणारा आणि आतां परिस्थितीवर मात करणारा!"

मग पाहुण्यांना धरणाकडे नेण्यांत आलें. त्यांनीं दाऱ्याची फळी वर सरकवतांच उसळी मारून पाणी पाटांत शिरलें आणि घसाघस शेतजमिनीच्या दिशेनें वाहूं लागलें.

सगळ्यांनीं टाळ्या पिटल्या आणि "भारतमाता की जय!" अशा घोषणा केल्या. पाणी पुढें सरकत होतें तसे लोक त्याच्या मागोमाग जात होते. शेवटीं धरणावर मुरारी,

मुरारीचें साळगांव



IRBK-0112545

यशवंतराव. कृष्णा आणि तात्या एवढेच उरले. मुरारी पाणी लोटलं होते त्या दिशेकडे निश्चलपणानें पाहात उभा होता. शेवटीं यशवंतराव त्याचा हात हातांत घेत म्हणाला,

"दादा, निघूं या ना आतां ?"

मुरारी म्हणाला,

"क्षणभर थांब. माझं फार दिवसांचं एक स्वप्न आज पुरं होतंय !"

"म्हणजे अजून तुझीं आणखी स्वप्नं आहेतच वाटतं ?"

"अरे, माणसाच्या स्वप्नांना कधीं अंत का असणार आहे ?" मुरारी म्हणाला आणि तो मंडळी जात होती त्या दिशेनें चालूं लागला.

संग्रहालय, ... क्र. २९९९८ विभाग का. वा. क्रमांक २१६० नों. दि. ३-७-... वाचनालय शाखा.

किंमत आठ आणे

चित्रशाळा प्रकाशन